# सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

अध्यक्ष : आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. विधानसभेचे सोमवार, दिनांक 06 मार्च, 2017 पासून सुरु झालेले अर्थसंकल्पीय अधिवेशन आज शुक्रवार, दिनांक 07 एप्रिल, 2017 रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या 20 असून प्रत्यक्षात 78 तास 24 मिनिटे कामकाज झालेले आहे. कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी 13 तास 39 मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज 03 तास 55 मिनिटे झालेले आहे.

एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या 10551 असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या 722 असून सभागृहात 71 प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या 05 असून स्वीकृत झालेल्या अल्पसूचना प्रश्नांची संख्या 01 आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या 2752 असून स्वीकृत लक्षवेधी सूचना 88 इतक्या आहेत. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना 33 आहेत.

या अधिवेशनात विधानसभेने एकूण 28 विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण 11 विधेयके (विधानसभेची 11 व विधान परिषदेचे 00) संमत केली.

अर्धा तास चर्चेच्या एकूण 235 सूचना प्राप्त झाल्या त्यापैकी 72 स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात 10 अर्धा तास चर्चेच्या सूचनांवर चर्चा झाली.

2..

नियम 293 अन्वये 02 प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली नाही.

संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती 76.30 % टक्के होती. त्यात जास्तीत जास्त उपस्थिती 89.49% टक्के तर कमीत कमी उपस्थिती 50.58 % टक्के एवढी होती.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे अधिकारी व सर्व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचा-यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

आता मी पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा व हे अधिवेशन संस्थगित करण्याबाबत माननीय राज्यपालांकडून जो संदेश आलेला आहे तो वाचून दाखवितो.